CMYK

जातनिहाय जनगणनेबाबत छगन भुजबळ धादांत खोटं बोलतायंत; ओबीसी नेते हरिभाऊ राठोडांचा दावा, म्हणाले, ते भाजपकडे झुकलेत >>पान 2

अभियंत्यांनी इतरांसाठी संधी आणि नोकऱ्या निर्माण करणारे उद्योग आणि संस्था स्थापन कराव्यात - राज्यपाल जिष्णु देव वर्मा >>पान 3

आमदार सिद्धार्थ खरात यांच्या वाढदिवसानिमित्त इंदुरीकर महाराजांचा कीर्तन सोहळा उत्साहात >>पान 4


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 05 ■ अंक 31 ■ सोमवार, दि. 17 ऑगस्ट 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


**सुविचार**

आयुष्य शिकवतं, पण ऐकण्याची तयारी लागते.



अभिनेत्री अनन्या राज यांचे ३५ व्या वर्षी निधन: मानसिक आणि शारीरिक आजारांशी झुंजत होती आतील पान

# उच्च न्यायालय लिपीक पदाचा पेपर फुटला: अभिजीत दिपके यांचे गंभीर आरोप

**दैनिक आपला विदर्भ**

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी :** उच्च न्यायालय लिपीक पदाचा पेपर फुटला असल्याचा आरोप कॉक्रोच जनता पार्टी प्रमुख अभिजीत दिपके यांनी केला. राज्यभरात रविवारी लिपीक पदाची परीक्षा होत असताना, तांत्रिक अडचणींमुळे मोठा गोंधळ निर्माण झाला. शहरातील सुराणा नगर येथील परीक्षा केंद्रावर अभिजीत दिपके यांनी भेट देत, विद्यार्थ्यांची बाजू परीक्षा केंद्रप्रमुखांपुढं मांडली.

यावेळी न्यायालय परीक्षा असल्यानं त्याचे सर्वस्वी अधिकार आमच्याकडं नाहीत, असं त्याला सांगण्यात आलं. मात्र जे काही उत्तर आहे ते आम्हाला




लिखित स्वरूपात हवं आहे, याबाबत नेमकी काय कार्यवाही होईल, याबाबतचा खुलासा देखील आम्हाला लिखित हवा आहे, अशी मागणी अभिजीत दिपके यांनी केली.

**राज्यात परीक्षेदरम्यान गोंधळ :** उच्च न्यायालयाच्या लिपीक पदांसाठी राज्यातील १३००० विद्यार्थ्यांनी आज टायपिंग परीक्षा दिली. मात्र या परीक्षेत राज्यातील बहुतांश केंद्रावर मोठा गोंधळ पाहायला मिळाला. टायपिंग परीक्षा देत असताना देण्यात आलेले संगणक हे निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला. लावण्यात आलेले स्क्रीन यांचा आकार कमी जास्त होता, त्या स्क्रीनचे रंग देखील सारखे बदलत होते, तर कीबोर्डवर एक अक्षर दाबलं, तर दुसरंच अक्षर तिथं येत होतं. त्यामुळे २० मार्कांच्या परीक्षेत विद्यार्थ्यांना पाच-सहा असे गुण पडले, परिणामी सर्वच विद्यार्थी नापास होत असल्याचा आरोप करण्यात आला. तांत्रिक अडचण असल्यानं ही परीक्षा रद्द करावी या मागणीसाठी विद्यार्थ्यांनी दुपारी एक वाजेपासून ठिय्या आंदोलन सुरू केलं होतं. आंदोलनात सायंकाळी सहा वाजता अभिजीत दिपके यांनी देखील हजेरी लावली.

**अभिजीत दिपके यांनी केली विद्यार्थ्यांसोबत चर्चा :** कॉक्रोच जनता पार्टी अध्यक्ष अभिजीत दिपके यांनी विद्यार्थ्यांसोबत चर्चा केली. त्यावेळी अनेक विद्यार्थ्यांच्या मोबाईलवर सुरू असलेला पेपर लिखित स्वरूपात प्राप्त झाला असल्याचं सांगितलं. त्यामुळे हा पेपर फुटला असल्याचा आरोप अभिजीत यांनी केला. तर परीक्षा केंद्रावर असलेल्या व्यवस्थापकांसोबत त्यांनी संवाद साधला, त्यावेळी ''या परीक्षेबाबत कुठलेही निर्णय घेण्याचा अधिकार आम्हाला नाही. मात्र आम्ही विद्यार्थ्यांचं म्हणणं सर्वोच्च न्यायालयात पाठवू आणि त्यानंतर जो निर्णय होईल, त्यानुसार परीक्षा पूर्ण घेण्याबाबत देखील आम्ही विचारणा करू,'' असं त्यांना सांगण्यात आलं. मात्र ''जे काही आश्वासन देत आहेत ते सर्व लिखित स्वरूपात प्राप्त झालं पाहिजे, उद्या या परीक्षांबाबत आम्ही जाब कोणाला विचारायचा? असा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे जे काही म्हणणं असेल ते लिखित स्वरूपात देऊन, विद्यार्थ्यांना काय न्याय देता येईल, या सर्व बाबी त्यात नमूद करून द्याव्यात,'' अशी मागणी अभिजीत दिपके यांनी केली. तर पोलिसांनी सहकार्य करावं असं आवाहन यावेळी करण्यात आली.

## टायगर श्रॉफ, शाहरुख खान आणि अजय देवगण यांना एफडीएची नोटीस

### विमल इलायची, पान मसाला जाहिरात करणं भोवलं

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** राज्याच्या अन्न व औषध प्रशासनाने विमल पान मसाला या जाहिरातीमध्ये काम केल्याप्रकरणी बॉलिवूड अभिनेते शाहरुख खान, अजय देवगण आणि टायगर श्रॉफ यांना करणे दाखवा नोटीस बजावली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अन्नसुरक्षा आणि मानके कायद्याच्या कलम २४ चा हवाला देत राज्य अन्न आणि औषध प्रशासनाने तिन्हीही कलाकारांना १५ दिवसांच्या आत सोशल मीडियावरून या जाहिरातीशी संबंधित सर्व प्रचार साहित्य काढून टाकण्याचे निर्देश दिलेत.

नोटिसा अभिनेत्यांना ब्रँड अँबेसिडर या नात्याने बजावण्यात आल्यात : याच बरोबर निर्देशांचे पालन न केल्यास अन्नसुरक्षा आणि मानके कायदा २००६ अंतर्गत कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा एफडीएने दिलाय. दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींवर बंदी आणि उत्पादकांच्या जाहिरातींवरील निर्बंधांच्या नियमांचा आधार घेत ही कारवाई करण्यात आलीय. या नोटिसा अभिनेत्यांना ब्रँड अँबेसिडर या नात्याने बजावण्यात आल्यात. अन्न सुरक्षा कायद्याच्या कलम २४ चा हवाला प्रशासनाने आपल्या नोटिशीमध्ये दिला आहे. याचबरोबर २००६ मधील २४ कलम २४चा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे. हे कलम अन्न उत्पादनांची संबंधित जाहिरातींवरील निर्बंध आणि दिशाभूल करणारे व्यापारी पद्धतीवर प्रतिबंध घालण्याच्या संबंधित कायदा आहे.

सेलिब्रिटींच्या सहभागावर प्रशासनाकडून सातत्याने कठोर नजर ठेवली जाते : एफडीएने निदर्शनास आणून दिले आहे की, विमल इलायची पान मसाला जाहिरात अजूनही विविध लिंक्स आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर उपलब्ध असून, त्याचा प्रचार केला जातोय. पान मसाला तंबाखू पदार्थांच्या अप्रत्यक्ष जाहिरातींमध्ये सेलिब्रिटींच्या सहभागावर




प्रशासनाकडून सातत्याने कठोर नजर ठेवली जात आहे. अशा जाहिराती विमलच्या नावाखाली चालल्या जात असल्या तरी त्या प्रत्यक्ष बंदी असलेल्या किंवा आरोग्यासाठी घातक असलेल्या तंबाखूजन्य पदार्थांनाच प्रमोट करतात, असा आक्षेप सातत्याने घेतला जातोय. यानंतर एफडीएने ही कारवाई केलीय.

एफडीएकडून गुटखा आणि पान मसाला विरोधात कारवाई : अजय देवगणला जुहूतील निवासस्थानी, शाहरुख खानला बांद्र्यातील मन्नत बंगल्यावर तर टायगर श्रॉफला त्याच्या प्रॉडक्शन हाऊसच्या पत्त्यावर नोटीस पाठवण्यात आलीय. अद्याप या नोटिसीवर तिन्ही अभिनेत्यांकडून कोणतीही प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. एफडीएकडून गुटखा आणि पान मसाला विरोधात कारवाई केली जात आहे. या बंदी असलेल्या उत्पादकांचा व्यवसाय होणाऱ्या ठिकाणाहून पोलिसांच्या मदतीने मोठी धाड टाकून कारवाई केली जातेय. मुंबईसह महाराष्ट्रमध्ये विविध ठिकाणी एफडीएने अशा धाडी टाकल्या आहेत. अशातच एफडीएने म्हणजेच अन्न आणि औषध प्रशासनाने जारी केलेल्या नोटिशीमध्ये तिन्ही अभिनेत्यांना जाहिरातीबाबत त्यांची भूमिका विचारली आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या मते बॉलीवूड अभिनेत्यांकडून करणाऱ्या येणाऱ्या जाहिरातींमधील उत्पादनाच्या ब्रँडचा संबंध प्रामुख्याने पान मसाल्याशी जोडला जातोय.

## ... तर गोपीनाथ मुंडेंचा जीव वाचला असता, संजय राऊत यांचा खळबळजनक दावा; म्हणाले, 'भाजपमध्ये त्यांचा छळ...'

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी पुन्हा एकदा भाजपवर जोरदार निशाणा साधला आहे. काँग्रेसचे नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी भाजपचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांच्याबाबत एक मोठा दावा केला होता. आता यासंदर्भात शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनीही गौप्यस्फोट केला आहे. गोपीनाथ मुंडेंचा भाजपमध्ये छळ झाला होता, असं त्यांनी म्हटलं आहे. गोपीनाथ मुंडे काँग्रेसमध्ये येणार होते. पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री असताना गोपीनाथ मुंडे आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अहमद पटेल यांच्यात गुप्त बैठका झाल्या होत्या. काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी यांनी गोपीनाथ मुंडे यांच्या पक्षप्रवेशाला आणि अटीला मंजुरी दिली होती, असा गौप्यस्फोट पृथ्वीराज चव्हाण यांनी केला होता. त्यांच्या या दाव्यावर संजय राऊतांनाही प्रतिक्रिया दिली आहे. मनमोहन सिंग हे पक्षांतराच्या विरोधात होते. शरद पवारांनीही त्यांना तोच सल्ला दिला. गोपीनाथ मुंडे याचा भाजपमध्ये छळ झाला. मानसिकदृष्ट्या त्यांच्यावर आघात केले जात होते. त्यांचा अपमान केला जात होता. आम्हाला माहितीये. आम्ही तेव्हा दिल्लीत होतो, असं संजय राऊतांनी म्हटलं आहे. संजय राऊत पुढे म्हणाले, ते पवार साहेबांना भेटले ते काँग्रेसच्या नेत्यांना भेटले. पण मनमोहन सिंग हे एक सज्जन गृहस्थ होते. त्यांनी अशा प्रकारच्या पक्षांतराला विरोध केला होता. त्याच्यामुळं त्यांना सल्ला दिला होता. तुम्ही आहेत तिथेच थांबा. ते काँग्रेसमध्ये आले असते तर कदाचित त्यांचे प्राण वाचले असते, असंही संजय राऊत यांनी म्हटलं आहे.

# राज्यात पुन्हा पावसाचा जोर वाढणार

## ६ जिल्ह्यांना यलो अलर्ट, घाटमाथ्यावर मुसळधार पावसाची शक्यता

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** राज्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाचा जोर काहीसा कमी झाल्याचे चित्र आहे. मात्र, आता पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असून, नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, राज्यातील रत्नागिरी, सातारा, पुणे, भंडारा, गडचिरोली आणि गोंदिया या सहा जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. या भागांमध्ये काही ठिकाणी जोरदार पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यता आहे. विशेषत: पुणे आणि सातारा जिल्ह्यांच्या घाटमाथ्यावर मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज आहे. कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातही पावसाचा जोर वाढण्याची शक्यता असून, नागरिकांनी नदी, नाले आणि धबधब्यांच्या परिसरात जाताना विशेष काळजी



घेण्याची गरज आहे. ग्रामीण भागात जोरदार पावसामुळे स्थानिक पातळीवर रस्ते आणि वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

विदर्भातील भंडारा, गडचिरोली आणि गोंदिया जिल्ह्यांमध्येही पावसाच्या जोरदार सरींचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. काही ठिकाणी पावसाचे प्रमाण वाढल्यास सखल भागात पाणी साचण्याची शक्यता आहे. दरम्यान, राज्यातील अनेक भागांमध्ये सध्या पावसाचे प्रमाण कमी-जास्त होताना दिसत आहे. त्यामुळे नागरिकांनी हवामान विभागाच्या ताज्या सूचनांकडे लक्ष द्यावे. मुसळधार पावसाच्या काळात नदीपात्र, ओढे, धबधबे आणि घाट परिसरात अनावश्यक प्रवास टाळावा, तसेच वाहनचालकांनी खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## दिवंगत नेत्याची बदनामी करणं पृथ्वीराज चव्हाणांना शोभत नाही, त्यांना मित्र पक्षांचा 'वाण नाही पण गुण लागला'; भाजपाची टीका

**दैनिक आपला विदर्भ**

**सातारा । प्रतिनिधी :** ज्या व्यक्ती आज आपल्यात नाहीत, त्यांच्याविषयी बिनबुडाचे आरोप करून त्यांच्या प्रतिमेची बदनामी करणे, हे पृथ्वीराज चव्हाणांसारख्या अनुभवी आणि ज्येष्ठ नेत्याकडून अजिबात अपेक्षित नाही. आम्ही त्यांना बुद्धिवान, अभ्यासू आणि विचारवंत समजत होतो. मात्र, गेल्या काही दिवसांतील त्यांची वक्तव्ये पाहता त्यांनाही महाविकास आघाडीतील मित्रपक्षांचा 'वाण नाही पण गुण लागला' असावा, अशी टीका भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष केशव उपाध्येंनी केली आहे.

गोपीनाथ मुंडे यांनी भारतीय जनता पार्टी खेडोपाडी आणि तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी आयुष्यभर प्रचंड कष्ट घेतले. अशा मुंडे साहेबांनी भाजपा सोडण्याचा विचार केला असेल, ही कल्पनाच हास्यास्पद आहे. जर खरोखरच अशी काही चर्चा झाली होती, तर इतकी वर्षे पृथ्वीराजबाबा गप्प का होते?, असा सवालही केशव उपाध्येंनी केला आहे.

कोणताही पुरावा आणि मुंडे साहेब हयात नसताना आता वावड्या उठवण्याचे




कारण काय? केवळ चर्चेत राहण्यासाठी आणि राजकीय वातावरण तापवण्यासाठी हा सगळा खटाटोप सुरू असल्याने त्यांच्या या वक्तव्यांकडे फार गांभीर्याने पाहण्याची आवश्यकता नसल्याचा टोला उपाध्येंनी लगावला आहे.

मी स्वत: त्या काळात मुंडे साहेबांसोबत होतो. काँग्रेस प्रवेशाबाबत अशी कोणतीही चर्चा किंवा बैठक झालेली नव्हती, ही वस्तुस्थिती आहे. गेल्या वर्षी याच सुमारास 'महिनाअखेर मोदी सरकार पडणार', अशा वल्गना करून पृथ्वीराज चव्हाण यांनी खळबळ उडवून दिली होती. प्रत्यक्षात काय झाले, हे देशाने पाहिले आहे. आता पुन्हा एकदा तशाच प्रकारच्या वावड्या उठवण्याचा प्रयत्न सुरू आहे. पण, सत्याच्या आरशात या वल्गनांचे प्रतिबिंब किती काळ टिकते, हे महाराष्ट्र पाहणारच असल्याचा उपरोधिक टोला त्यांनी लगावला आहे.

# एकनाथ शिंदेंचा खास माणूस रात्री अकोल्यात पोहोचला, अभय पाटलांसोबत दोन तास गुप्त खलबतं, महत्त्वाच्या घडामोडींचे संकेत




**दैनिक आपला विदर्भ**

**अकोला । प्रतिनिधी :** अकोल्यात काँग्रेसकडून लोकसभा लढवलेले डॉ. अभय पाटील यांची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे खास असलेल्या अॅड. निलेश देशमुखांनी भेट घेतली. डॉ. अभय पाटील यांच्या टॉवर चौकातील निवासस्थानी रात्री ही भेट पार पडली. वर्षभरापूर्वी पक्षाच्या कार्यपद्धतीवर नाराज होऊन काँग्रेस सोडणारे डॉ. अभय पाटील मोठा राजकीय निर्णय घेण्याच्या तयारीत असल्याची जोरदार चर्चा सध्या रंगली आहे. अलीकडेच डॉ. पाटील यांनी एकनाथ शिंदेंची भेट घेतली होती. पुढच्या दोन दिवसात डॉ. अभय पाटील आपल्या समर्थकांची बैठक घेऊन आपला राजकीय निर्णय घेण्याच्या तयारीत असल्याचे समजते. त्याच पार्श्वभूमीवर या बैठकीआधी ?ड. निलेश देशमुख यांनी



डॉ. पाटील यांची भेट घेतल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. या दोघांमध्ये बंद दाराआड तब्बल दोन तास चर्चा झाली. उभय नेत्यांनी एकत्र जेवणही केले. त्यामुळे सध्या अकोल्याच्या राजकारणात या 'डिनर डिप्लोमॅसी'ची जोरदार चर्चा रंगली आहे.

अकोल्यात शिंदेंच्या शिवसेनेकडून मोठा राजकीय मासा गळाला लावण्याचे प्रयत्न सुरु आहेत. २०२४ मध्ये काँग्रेसचे लोकसभेचे उमेदवार असलेल्या डॉ. अभय पाटील यांनी नुकतीच मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. दोघांच्या तासभराच्या भेटीत पुढच्या राजकीय निर्णयाबद्दल उहापोह झाल्याची चर्चा होती. त्यानंतर आता डॉ. पाटील यांच्या भेटीसाठी निलेश देशमुख यांनी थेट अकोल्यात धाव घेतल्याने डॉ. अभय पाटील लवकरच शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत डॉ. अभय पाटील हे तब्बल ४ लाख १६ हजार मते घेत दुसऱ्या स्थानावर राहिले होते. तर वंचितचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर हे तिसऱ्या क्रमांकावर होते. दरम्यान, काँग्रेसच्या कार्यपद्धतीला कंटाळून वर्षभरापूर्वी डॉ. पाटील यांनी पक्षाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर त्यांनी कोणत्याही राजकीय पक्षामध्ये प्रवेश केलेला नव्हता. मात्र, एकनाथ शिंदे यांच्या भेटीनंतर काँग्रेसच्या नेत्यांनी अकोल्यात नुकतीच त्यांची भेट घेत त्यांची मनधरणी करण्याचा प्रयत्न केला. डॉ. अभय पाटलांनी पुढच्या दोन दिवसांत आपल्या समर्थकांची बैठक बोलावली आहे. या बैठकीनंतर डॉ. अभय पाटील पुढचा राजकीय निर्णय घेणार आहेत.

### कोण आहेत डॉ. अभय पाटील?

१) विदर्भातील नामवंत अस्थिरोगतज्ञ.

२) वडील डॉ. के. एस. पाटील विदर्भातील नामवंत अस्थिरोगतज्ञ होते. डॉ. के. एस. पाटील विश्व हिंदू परिषदेचे मोठे नेते.

३) आधीच्या कार्यकारिणीत डॉ. अभय पाटील प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस होते

४) डॉ. पाटील अकोला होते २०२४ च्या लोकसभेत काँग्रेसचे उमेदवार

५) मराठा मोर्चाच्या समन्वयकांपैकी एक.

२०२४ च्या लोकसभेत अकोल्यात उमेदवारांना मिळालेली मते

अनुप धोत्रे : भाजप : ४५७०३०

डॉ. अभय पाटील : काँग्रेस : ४१६४०४

प्रकाश आंबेडकर : वंचित : २७६७४७

भाजपचे अनुप धोत्रे ४० हजार ६२६ मतांनी विजयी.

CMYK

# 'जेन झी'मध्ये माध्यम-मंचाचे एक नवे रूप समोर आले

समाजमाध्यमांचे वेगवेगळे मंच हे केवळ संवाद साधण्याचे किंवा अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा उपभोग घेण्याचे साधन आहे, असा या माध्यमांच्या मंचावर वावरणाऱ्या सर्वसामान्यांचा समज असला, तरी हे माध्यम तेवढ्यापुरतेच नाही, हे आता लक्षात येऊ लागले आहे. तळहातावरल्या मोबाईलच्या स्क्रीनवर दिसणारी एखादी जाहिरात किंवा कोणताही एखादा अवांतर मजकूर सहज कुतूहल म्हणून पाहण्यासाठी मारली जाणारी एक टिचकीदेखील या माध्यमाच्या समाजास अनभिज्ञ असलेल्या कोणा अज्ञात 'अतींद्रिय' शक्तीचा अनुभव देते, हे अनेकांनी अनुभवले असेल. एखाद्या उत्पादनाची किंवा करमणुकीच्या माध्यमाची जाहिरात पाहिली की पाठोपाठ इच्छा नसताना सुरू होणारा अशा जाहिरातींचा भरमसाट मारा हे या माध्यमांच्या मार्केटिंगचे मूळ सूत्र असते, याची सहसा जाणीव कोणास होत नसली, तरी या सूत्रानुसारच समाजमाध्यमांचा धंदा चालतो आणि सामान्य वापरकर्ता मात्र आपल्या कुतूहलाचा कंड शमविण्यासाठी सतत स्क्रीनवर 'स्क्रोल' करत आपला वेळ घालवत राहतो. गेल्या काही दिवसांत या माध्यमाने अनेक क्षेत्रांत प्रचंड खळबळ माजविली आणि समाजाचे सुरळीत चाललेले दैनंदिन रहाटगाडगे पुरते उलटेसुलटे करून टाकले, हे आपल्या देशातील राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांत झालेल्या अनपेक्षित उलथापालथीनंतर स्पष्ट झाले. जंतर मंतरवरील जेन-झीच्या आंदोलनानंतर गेल्या २३ जुलै रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी फेसबुकवरून देशातील युवकांना उद्देशून प्रसारित केलेला व्हिडीओ संदेश तात्पुरता हटविण्यात आल्यानंतर या माध्यम-मंचाचे एक नवे रूप समोर आले. यामुळे सरकारी स्तरावर निर्माण झालेल्या राजकीय वादळाचे पडसाद देशभर उमटले आणि व्हिडीओ संदेश हटविण्यामागील कारण स्पष्ट करून माफी मागण्याची तंबी 'मेटा' या तंत्रज्ञान क्षेत्रातील दिग्गज कंपनीचे सर्वेसर्वा मार्क झुकरबर्ग यांना सरकारने दिली. मेटाने माफी मागितली नाही, तर या कंपनीस मिळणारे संरक्षण गमवावे लागेल, असा इशाराही सरकारने दिल्यानंतर, व्हिडीओ हटविण्याच्या कृतीवर स्पष्टीकरण देताना एका तांत्रिक चुकीचे कारण देत या कंपनीचे जागतिक सार्वजनिक धोरणप्रमुख जोएल कॅपलॉन यांनी मार्क झुकरबर्ग यांच्या वतीने भारत सरकारची माफी मागितली. हे प्रकरण वरवर दिसते तेवढे सहज नाही, यामागे एक आखणीबद्ध व्यवसाय-नीती कार्यरत असते, ही बाब या निमित्ताने आता समोर येऊ लागली आहे. याच कंपनीच्या अन्य एका माध्यम मंचावर दिसणाऱ्या बाल लैंगिक शोषणाच्या जाहिरातींचीही गंभीर दखल घेतली गेली आणि कोणत्याही एखाद्या विशिष्ट प्रकारचा मजकूर, जाहिराती किंवा वापरकर्त्यांपर्यंत पोहोचणाऱ्या 'कंटेन्ट'ला चालना देण्यासाठी मोठी आर्थिक उलाढाल होत असते, हे उघड झाले. अशा प्रकारचा बेकायदेशीर 'कन्टेन्ट' विशिष्ट प्रेक्षकांसाठी प्रसारित करण्यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार झाल्याची कबुली दिली गेल्याचे सांगण्यात येते. या चुकीबद्दल मेटाने माफी मागून खेद व्यक्त केला असला, तरी समाजमाध्यम हा केवळ वेळ घालविण्याचा मंच नसून सावधगिरीने वावरण्याचे स्थान आहे, हे एव्हाना स्पष्ट झाले आहे. अशा प्रकारच्या अनेक घडामोडी या मंचाद्वारे नेमक्या आणि निवडक समाजघटकांपर्यंत पोहोचविण्यात येतात हे जेन-झी आंदोलनानंतर स्पष्ट झाले. या आंदोलनास या माध्यमाच्या विविध मंचांवरून सुरू झालेल्या अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या जोरदार प्रवाहाचेच बळ लाभले होते, हे स्पष्ट आहे. केवळ भारतातच नव्हे, तर गेल्या चार-दोन वर्षांत, विशेषतः कोविडोत्तर काळातील सामाजिक आणि राजकीय घडामोडींचा वेग प्रचंड वाढला आहे. अनेक क्षेत्रांत अनपेक्षित आणि अनाकलनीय रीतीने घडणाऱ्या घडामोडींनी सामान्यांचे जग संभ्रमित होऊन गेले आहे. समाजमाध्यमांचे मंच या संभ्रमात मोलाची भर घालण्याकरिता सतत सरसावून बसलेले आहेत, हे आता गुपित राहिलेले नाही. म्हणूनच, सामान्यांच्या दृष्टीने समाजमाध्यमे हे केवळ वेळ घालविण्याचे संवाद साधण्यात किंवा मते व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य उपभोगण्याचे हक्काचे साधन असले, तरी त्यामागे जागतिक स्तरावरील समाजकारण, सांस्कृतिकता किंवा अर्थकारणास हवे तसे वळण देण्याची ताकद आहे, याचा अनुभवही येऊ लागला आहे. एका बाजूला कृत्रिम बुद्धिमत्तेची हत्यारे अधिक धारदारपणे आक्रमक झालेली आहेत. या हत्यारांनी रोजगाराच्या असंख्य संधी घायाळ झाल्याने, हे आक्रमण आणखी कोणते अराजक माजविणार या भीतीने समाज ग्रस्त झालेला आहे. कारण तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा वेग कल्पनातीत असून त्या वेगाने धावणे सामान्य माणसाच्या आवाक्याबाहेरचे तर आहेच, पण कृत्रिम बुद्धिमत्तेचा सामान्य मेंदूच्या बुद्धीने वापर करण्याचे कौशल्य आत्मसात करण्यातही सामान्य माणसे कमी पडत आहेत. त्यामुळेच कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून समाजमाध्यमांचे वेगवेगळे मंच सामान्यांच्या सहज जीवनात धुमाकूळ घालू शकतात. त्यामुळे प्रसंगी समाजस्वास्थ्य संकटातही येऊ शकते हेदेखील आता स्पष्ट झाले आहे. केवळ 'फॉलोअर्स आणि 'लाईक्स'द्वारे स्वयंप्रतिमा निर्माण करण्याच्या वेडाने झपाटलेल्या पिढ्यांच्या मनाचा कब्जा या मंचाने घेतल्याचे स्पष्ट झाल्याने या माध्यमाचा मवाळ मुखवटा दूर होऊ लागला असून धंदेवाईक चेहऱ्याने या माध्यमाचे वेगवेगळे मंच आता मानवी व्यवहारांवर कब्जा करण्यासाठी सरसावले आहेत. अलिकडेच देशाच्या राजधानी दिल्लीतील जंतर मंतर मैदानावर झालेल्या जेन-झीच्या आंदोलनाचे लोण देशभर पसरविण्यात या माध्यमाच्या मंचाने महत्त्वाची भूमिका बजावली होती. आसपासच्या अन्य काही देशांतील जेन-झीच्या आंदोलनांनादेखील या माध्यम-मंचाचे मोठे बळ लाभले होते. या माध्यमांचे सर्व मंच मोफत आहेत, असे वरवर पाहता वाटत असले, तरी त्यामागे मोठे अर्थकारण कार्यरत असते. फेसबुक, इन्स्टाग्राम, थ्रेडस, व्हॉटसपचा सर्वसामान्यांकडून होणारा वापर हे मेटासारख्या कंपन्यांचे उत्पादन नसते, तर वापरकर्त्यांकडून वापरला जाणारा डेटा आणि वापरकर्त्यांनी या मंचावर वावरण्यासाठी खर्च केलेला वेळ हे या क्षेत्राचे व्यावसायिक उत्पादन असते. या मंचाचा वापर करणाऱ्या घटकांच्या वर्गवारीनुसार विशिष्ट जाहिराती त्यांच्यासमोर प्रसृत करणे, वापरकर्त्यांच्या वर्तन आणि डेटा वापराचे विश्लेषण करणे, फेसबुक किंवा इन्स्टाग्रामसारख्या मंचावर आपले 'पेज' चालविणाऱ्यांकडून खरेदी केल्या जाणाऱ्या जाहिराती, ऑनलाईन व्यवसाय वृद्धीसाठी ग्राहकांशी साधला जाणारा संपर्क आदी अनेक बाबींद्वारे या मंचाला मोठे उत्पन्न मिळत असते. शिवाय, विशिष्ट वापरकर्ते कोणत्या बाबींवर विशेष लक्ष देतात याचे विश्लेषण करून कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीचे अद्ययावतीकरण करण्यासाठीही वापरकर्त्यांचाच वापर केला जातो. अशा प्रकारे वापरकर्त्याच्या मानसिकतेचे नेमके विश्लेषण केल्यानंतर कोणत्या वापरकर्त्यास कोणत्या जाहिराती दाखवायच्या कोणता मजकूर त्याच्यासमोर ठेवायचा आणि कोणता मजकूर त्याच्यापर्यंत पोहोचू द्यायचा नाही, हे ठरविणारी अल्गोरिदम नावाची एक प्रशासकीय यंत्रणा हेच काम करत असते. वापरकर्त्याने अधिकाधिक वेळ मंचावर वावरत राहावे याची नेमकी नीती अल्गोरिदमद्वारे ठरली, की जेवढा जास्त वेळ मंचावर वावर असेल, तेवढ्या जास्त पोस्ट त्याच्यासमोर दाखविल्या जातील आणि तितक्या अधिक जाहिरातींचा मारा वापरकर्त्यावर करून अधिकाधिक महसूल मिळविता येईल,

# जातनिहाय जनगणनेबाबत छगन भुजबळ धादांत खोटं बोलतायंत; ओबीसी नेते हरिभाऊ राठोडांचा दावा, म्हणाले, ते भाजपकडे झुकलेत

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा | प्रतिनिधी :** केंद्र सरकारने जातनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतल्यानंतर ओबीसी नेत्यांकडून त्याचं स्वागत केलं जात आहे. महाराष्ट्रातील ओबीसी नेते (ध्ँ) तथा मंत्री छगन भुजबळ यांनीही या निर्णयाचे स्वागत केले असून सामाजिक न्यायाच्या लढ्याला ऐतिहासिक यश आल्याचं म्हटलं आहे. तर, यापूर्वी जनगणनेत जात हा विषय नव्हता. पण आता जातनिहाय जनगणनेचा विषय मंजूर झाल्याने एका कमांडवर देशभरातली ओबीसी समाजाची लोकसंख्या हातात येणार आहे, असे वक्तव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. तर, २०११ च्या जनगणनेत जातीचा कॉलम नव्हता, आता तो कॉलम ॲड केल्याचं सांगत भुजबळ यांनी या निर्णयाचे स्वागत केले. तसेच जातनिहाय जनगणनेसाठी आपण २० वर्षापासून आवाज उठवला, सन २०१० मध्ये समता परिषदेने याच





मागणीसाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती, असेही म्हटले. आता, भुजबळांच्या वक्तव्यावर ओबीसी नेते हरिभाऊ राठोड यांनी आक्षेप घेतला आहे.

जातिगत जनगणनेबाबत छगन भुजबळ धांदात खोटे बोलत आहेत, २०११ ची जनगणना झाली, तेव्हा सुद्धा जातीचे कॉलम होते. सन २०११ मध्ये ग्रामीण विभागाकडून झालेल्या जनगणनेसाठी पूर्ण देशामध्ये २० हजार कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत, याची कबुली केंद्र सरकारने लोकसभेमध्ये दिली आहे. त्यावेळेस त्यांनी सांगितले की, जातिगत जनगणना झालेली आहे. परंतु काही तांत्रिक कारणामुळे तो डाटा व्यवस्थित जमा झाला नाही. याशिवाय एस.टी आणि एस.सी. सोडून इतर जातीची जनगणना आम्ही सार्वजनिक करणार नाही हे सुद्धा तत्कालीन सरकारने सांगितले होते. असं असताना मंत्री छगन भुजबळ हे कसे काय सांगत आहेत की २०११ च्या जनगणनेमध्ये जातीचा कॉलम नव्हता आणि आता जातीचा कॉलम आहे, असा प्रश्न ओबीसी नेते तथा माजी खासदार हरिभाऊ राठोड यांनी विचारला.

एकंदरीत छगन भुजबळ हे ओबीसीचे नेते असूनही पूर्णपणे बीजेपीकडे झुकल्याचे दिसत आहे. तसे पाहिले तर यापूर्वी मंत्री छगन भुजबळ यांनी बरेच काही नुकसान ओबीसीचे केले आहे, त्यांच्या मंत्रिमंडळात असाही निर्णय घेण्यात आला की एस. इ .बी .सी असा कुठलाही प्रयोग नसताना कायद्याद्वारे मराठा समाजाला ओबीसी म्हणून घोषित करण्यात आले. सन २०११ मध्ये जनतेची जी फसवणूक झाली तीच फसवणूक हे सरकार करत आहे. ओबीसींची वारंवार फसवाफसवी करणे थांबवावे अन्यथा एक दिवस ओबीसी नक्कीच जागा होईल आणि बीजेपीला घरी पाठवल्याशिवाय राहणार नाही. ओबीसींना आपण किती दिवस फसवणार आहात, असेही हरिभाऊ राठोड यांनी म्हटले.

### भुजबळांकडून मोदींचे आभार, कोर्टाचा दाखला

मी मोदी साहेबांचे एका कार्यक्रमात जाहीर आभार मानले, समता परिषद स्थापनेनंतर जिथे जिथे ओबीसी मेळावे झाले त्या ठिकाणी आम्ही जातनिहाय जनगणना करा अशी मागणी केली होती. ज्या ज्या वेळी ओबीसी समाजाला काही द्यायचे असते, त्या त्या वेळी कोणीतरी कोर्टात जाते. मग कोर्ट विचारते संख्या किती? यापूर्वी जातनिहाय जनगणना १९३१ साली झालेली आहे. त्यावेळी ती ५४ टक्के लिहिली आहे, अशी माहिती छगन भुजबळ यांनी दिली. तसेच, कोर्ट नेहमी विचारते आता ओबीसींची लोकसंख्या किती आहे ते सांगा. त्यामुळे, आमची मागणी सातत्याने होती, आहे. जातनिहाय जनगणना होते आहे, अतिशय आनंदाची गोष्ट आहे, असेही भुजबळ यांनी म्हटले.

# निसर्गाच्या संरक्षणासाठी नागपंचमी निमित्त व्हावे वृक्षारोपण

श्रावण महिना आला की आगळे-वेगळे वातावरण निर्माण होते व सणांना सुरूवात होवून सर्वत्र उत्साहाचे वातावरण दिसून येते.श्रावण महिन्यात नागपंचमीला अत्यंत महत्व दिल्या जाते. नागपंचमीच्या दिवशी घरोघरी नागाच्या प्रतिमेची पूजाअर्चना केली जाते.नागपंचमीचा उल्लेख आपल्याला अनेक पुराणांमध्ये सुध्दा पहायला मिळतो.नागपंचमीचे महत्व भगवान श्रीकृष्णांशी सुध्दा निगडित आहे.याबाबतची कालियामर्दनाची आख्यायिका प्रसिद्ध आहे.

या आख्यायिकेनुसार बालपणातील श्रीकृष्णाला मारण्यासाठी कंस कालिया नावाच्या नागाला पाठवितो. परंतु श्रीकृष्ण कालियाचा पराभव करतो व यमुना नदीच्या पात्रातून श्रीकृष्ण सुरक्षीत वर येतात तो दिवस म्हणजे श्रावण शुद्ध पंचमी.पराभवानंतर कालिया नाग श्रीकृष्णाची माफी मागतो आणि तेथुन निघुन जातो. त्यामुळे कालिया नागावरील कृष्णाच्या विजयाला सुध्दा नागपंचमीच्या स्वरूपात साजरी केली जाते.दर १२ वर्षांनी नागपंचमीच्या दिवशी देशभरातील नाथ संप्रदायाचे लोक गंगा-गौतमी (अहिल्या - गौतमी) संगमावर स्नान करतात.अशीही आख्यायिका आहे की,एक शेतकरी शेत नांगरणी करीत असतांना नागिणीच्या तीन पिल्लांचा मृत्यू झाला व त्यामुळे नागदेवतेचा कोप झाला अशी समजूत प्रचलित आहे.त्यामुळे या दिवशी शेतकरी आपल्या शेतात नांगर,वखर,कोणतेही खोदकाम करीत नाही किंवा कोणत्याही अवजारांचा वापर होत नाही.त्याचप्रमाणे घरकामात वापरण्यात येणाऱ्या कोणत्याही अवजारांचा वापर केला जात नाही.भाज्या चिरायच्या नाही,तव्याचा वापर नाही, कांडन नाही,कापन नाही,असे काही नियम आजही पाळले जातात.नागपंचमीच्या दिवशी श्रद्धाळू नागदेवतेच्या फोटोंची किंवा मुर्तीची पुजाअर्चना करून दूध-लाह्यांचा व शिऱ्याचा प्रसाद करून नैवेद्य दाखवतात आणि शेतीचे व आपले संरक्षण करण्यासाठी सर्वच प्रार्थना करतात.देशात श्रावण माहिन्यात प्रत्येक सोमवारला अनेक मंदिरांमध्ये शेज(सजावट)केल्या जाते. त्याचप्रमाणे प्रत्येक देवतांच्या ठराविक दिवशी नीटनेटकी सजावट करून संपूर्ण श्रावण महिना मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने पाळला जातो.

श्रावण महिन्यातील सोमवार हा उपवास बहुतेक सर्वच जण करतात व मोठ्या भक्तिभावाने शंकराची,शंकराच्या पिंडेची व नागाची पुजाअर्चना करतात. नागपंचमी हा श्रावण महिन्यातील पहिला सण असल्याने सर्वत्र आनंदमय व सुखमय वातावरण दिसून येते.श्रावण मासात विविध सण येतात त्यापैकी नागपंचमी, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी, नारळी पौर्णिमा इत्यादी अनेक सण येतात. महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्याच्या पश्चिमेला असलेला शिराळा तालुका नागपंचमीसाठी जगप्रसिद्ध आहे.सांगली जिल्ह्यातील हा एकमेव प्रदेश निसर्ग समृद्ध आहे.पूर्वी नागपंचमी उत्सव शिराळ्यात मोठ्या प्रमाणात साजरा केला जायचा.

तेव्हा नागपंचमीच्या एक महिना आधी येथील नाग मंडळेनाग पकडायच्या मोहिमेला निघत.यानंतर पकडलेल्या नागांची (सापांची) नागपंचमी संपेपर्यंत योग्य प्रकारे काळजी घेतली जात असे. नागपंचमीच्या दिवशी शिराळा गावात ग्रामदेवतेची पूजा करून नागांची एकाच वेळी मिरवणूक काढली जायची. परंतु वन्य जीव संरक्षण कायद्यानुसार २००२ पासून सापांना पकडण्यावर बंदी आली.त्यामुळे काही वर्षांपासून शिराळ्यात फक्त नागाच्या प्रतीकात्मक मुर्तीची मिरवणूक काढली जाते. सध्या शिराळामध्ये ६५ नागराज मंडळे आहेत ही प्रतिकात्मक नाग पूजा करतात व प्रतिकात्मक नागमूर्तीची मिरवणूक काढतात.आज वन्य जीव संरक्षण कायद्यामुळे अनेक प्राण्यांना जीवनदान मिळाले आहे. त्यामुळे संपूर्ण प्राणीमात्रांची जोपासना करण्याचे दायित्व आपणासर्वांवर आहे.आजही भारतातील महाराष्ट्र,राजस्थान, मध्यप्रदेश ,गुजरात,केरळ, तामिळनाडू या प्रांतात नाग पूजा मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरी केली जाते. मध्यप्रदेशातील सातपुडा पर्वतावर भारतातील तीर्थस्थान नागव्दार प्रसिद्ध आहे.याठीकाणी नागाचा वास मोठ्या प्रमाणात असल्याचे सांगितले जाते.

त्यामुळे याठीकाणी संपूर्ण श्रावण महिन्यात मोठ्या प्रमाणात भव्यदिव्य यात्रा असते. त्याचप्रमाणे याच परिसरात जटाशंकर नागाचे प्रसिद्ध ठिकाण आहे.येथील अशी आख्यायिका आहे की भगवान शंकरजींचे तांडव सुरू असतांना आपल्या केसांच्या जटा याच ठिकाणी आपटल्या होत्या.त्यामुळे या तिर्थक्षेत्राला जटाशंकर म्हणून संबोधले जाते. श्रावण महिन्यांत बेलपत्तीला जास्त महत्त्व आहे.त्यामुळे शंकराची व नागाची पूजाअर्चा करतांना बेलफुल वापरण्यात येतो.भारतीय संस्कृतीत प्रत्येक प्राणी,वनस्पती, फुल एवढंच काय तर संपूर्ण सृष्टीला देवाच्या रूपात पाहिलं जाते.त्यामुळे नागपंचमीच्या निमित्ताने संपूर्ण प्राणीमात्रांना वाचविण्याचासाठी निसर्ग प्रफुल्लित ठेवणें अत्यंत गरजेचे आहे.याकरीता श्रावण महिन्याचे व नागपंचमीचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला पाहिजे.यामुळे निसर्ग प्रफुल्लित राहील व जंगलातील प्राण्यांना जंगलात रहाण्याचा आनंद मिळेल.आज पृथ्वीला वाचवायचे असेल तर प्रत्येक सणांना मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करणे अत्यंत गरजेचे आहे .कारण बदलत्या हवामानामुळे,ग्लोबल वॉर्मिंगमुळे व वाढत्या अलनिनोच्या प्रभावामुळे पर्यावरणात आमुलाग्र बदल झाला असून देश मोठ्या प्रमाणात प्रदुषणाच्या विळख्यात सापडलेला आहे यापासून सावरण्यासाठी वृक्षलागवड करणे अत्यंत आवश्यक आहे.कारण वृक्षाशीवाय सृष्टी अधुरी आहे.त्यामुळे सर्वांसाठीच वृक्ष अनिवार्य आहे. पृथ्वी साबुत रहाली तर संपूर्ण जीवसृष्टी सुरक्षित राहील अन्यथा विनाश अटळ आहे.कारण वृक्ष कटाईमुळे पृथ्वीचे संतुलन डगमगत आहे.त्यामुळे भुकंप, महाप्रलय, सुनामी,अती थंडी,अती उष्णता, ज्वालामुखी, दुष्काळ,भूस्खलन, समुद्राची पातळी वाढते अशा विविध धोकादायक घटना दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत असून भयावह रूप धारण करीत आहे.याकरीता येणाऱ्या विनाशापासुन वाचण्यासाठी झाडे लावा जीव सृष्टी वाचवा हा मूलमंत्र सर्वांनीच अंगिकारला पाहिजे. नागव्दार स्वामी की जय!जय नाग देवता!हर हर महादेव!

-------------

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# जलयुक्त महाराष्ट्र घडवूया!

महाराष्ट्रातील पाणीटंचाई, घटती भूजल पातळी आणि मातीची धूप यावर दीर्घकालीन उपाययोजना करण्यासाठी राज्य शासनाने जलसंधारणाला लोकचळवळीचे स्वरूप देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. मृद व जलसंधारण विभागाने ७ ऑगस्ट २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार १५ ते २१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत 'जलसंधारण सप्ताह', तर १५ ऑगस्ट २०२६ ते २६ जानेवारी २०२७ या कालावधीत 'जलसंधारण अभियान' राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

राज्यातील अनेक भागांत भूजल पातळी खालावत असून पाणीटंचाईचे आव्हान निर्माण होत आहे. मोठ्या धरणांवरील अवलंबित्व कमी करून पाणलोट विकास आणि भूजल पुनर्भरणावर भर देण्याची गरज शासन निर्णयात अधोरेखित करण्यात आली आहे. याच उद्देशाने माजी मुख्यमंत्री सुधाकररावजी नाईक यांनी दिलेला 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हा मूलमंत्र जलसंधारण चळवळीचा आधार मानण्यात आला आहे. त्यांच्या जलसंधारण क्षेत्रातील योगदानाच्या स्मरणार्थ २१ ऑगस्ट हा दिवस राज्यात 'जलसंधारण दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

माती आणि पाणी ही परस्परांशी जोडलेली नैसर्गिक संसाधने आहेत. शेती, पर्यावरण आणि शाश्वत




विकासाचा पाया असलेल्या या दोन्ही संसाधनांचे संरक्षण भविष्यातील पिढ्यांसाठी आवश्यक आहे. त्यामुळे केवळ सरकारी यंत्रणेपुरते मर्यादित न राहता नागरिक, युवक, विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था आणि विविध सामाजिक संघटनांचा सहभाग वाढविण्यावर शासनाने भर दिला आहे. जलसंधारण दिनानिमित्त २१ ऑगस्ट रोजी राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर' आयोजित करण्यात येणार आहे. "Save Soil, Save Water, Secure Tomorrow' ही या उपक्रमाची थीम असून 'पाणी अडवा, पाणी जिरवा, जलयुक्त महाराष्ट्र घडवा' हा संदेश देण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात कमाल तीन किलोमीटरचे चालण्याचे आयोजन करून मृद व जलसंधारणाची शपथ घेतली जाणार आहे.

या उपक्रमात लोकप्रतिनिधी, अधिकारी-कर्मचारी, विद्यार्थी, NCC, NSS, युवा संघटना, स्वयंसेवी संस्था, खेळाडू, उद्योजक, कलाकार, सामाजिक संस्था तसेच सर्वसामान्य नागरिकांना सहभागी करून घेण्यात येणार आहे. १५ वर्षे व त्यावरील पुरुष व महिला सहभागी होऊ शकतील. जिल्हाधिकाऱ्यांवर या उपक्रमाच्या आयोजनाची प्रमुख जबाबदारी सोपविण्यात आली आहे. जलसंधारण सप्ताहात युवकांचा सहभाग वाढविण्यासाठी "Reel for Soil and Water Conservation' ही राज्यव्यापी स्पर्धाही आयोजित करण्यात आली आहे. १५ ते ३० वर्षे वयोगटातील युवक-युवतींना ३० ते ६० सेकंदांच्या Instagram Reels तयार करून माती आणि पाणी संवर्धनाचा संदेश देण्याची संधी मिळणार आहे. मातीची धूप रोखणे, पाणी बचत, पावसाच्या पाण्याचे संकलन, शेततळी, बंधारे, पाणलोट क्षेत्र विकास, वृक्षारोपण आणि पर्यावरण संरक्षण अशा विविध विषयांवर रील्स तयार करता येणार आहेत. या स्पर्धेत विषय व संदेश, कल्पकता, सामाजिक परिणाम, सादरीकरण व तांत्रिक गुणवत्ता तसेच सोशल मीडिया सहभागाच्या आधारे गुणांकन केले जाणार आहे. जिल्हास्तरावर प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या विजेत्यांना अनुक्रमे २५ हजार, १५ हजार आणि १० हजार रुपयांचे पुरस्कार देण्यात येणार आहेत.

जलसंधारण अभियान २६ जानेवारी २०२७ पर्यंत सुरू राहणार असल्याने शाळा आणि महाविद्यालयांमध्येही विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. निबंध, चित्रकला, पोस्टर आणि वादविवाद स्पर्धांसोबत 'एक शाळा-एक शोषखड्डा' हा उपक्रम राबविण्याची सूचना देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना पाणी बचतीचे महत्त्व समजावून सांगणे, जलमित्र किंवा जलदूत घोषित करणे आणि २१ ऑगस्ट रोजी मृद व जलसंधारणाची शपथ देणे यावरही भर आहे.

अभियानाच्या कालावधीत ग्रामीण तसेच शहरी भागात जलसंधारणाच्या कामांना लोकसहभागाची जोड देण्यात येणार आहे. मृद व जलसंधारणाच्या कामांचे भूमिपूजन, लोकार्पण आणि जलपूजन, अमृत सरोवरांना भेट, तलाव परिसरात वृक्षारोपण, 'एक पेड माँ के नाम' अभियान आणि नाला, तलाव, विहीर व पाझर तलावांच्या स्वच्छतेसारखे उपक्रम राबविण्याचे निर्देश आहेत. शेततळी, शेतबंधारे, CCT आणि Deep CCT यांची पाहणी करण्यावरही भर देण्यात आला आहे.

राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हास्तरीय मृद व जलसंधारण समितीचे अध्यक्ष म्हणून जिल्हाधिकाऱ्यांवर महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. कृषी, ग्रामविकास, महसूल व वन, जलसंपदा, पाणीपुरवठा व स्वच्छता, रोजगार हमी योजना आणि शिक्षण विभागांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती, नगरपालिका आणि महानगरपालिका क्षेत्रात विविध कार्यक्रम आयोजित करून जनजागृती करण्याचेही शासनाने स्पष्ट केले आहे.

जलसंधारण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. पावसाचा प्रत्येक थेंब अडवणे, भूजल पुनर्भरण करणे, मातीची धूप रोखणे आणि पाण्याचा काटकसरीने वापर करणे ही काळाची गरज आहे. शासनाच्या या अभियानातून जनसहभाग, युवकांची ऊर्जा आणि आधुनिक डिजिटल माध्यमांची ताकद एकत्र आल्यास जलसंधारणाची चळवळ अधिक व्यापक होऊ शकते. 'माती वाचवा, पाणी जपा, सुरक्षित भविष्य घडवा' या विचारातून जलसमृद्ध, दुष्काळमुक्त आणि शाश्वत महाराष्ट्र घडविण्याच्या दिशेने हे अभियान महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे.

०००० 
**अतुल पांडे**
**सहायक संचालक (माहिती)**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# अभियंत्यांनी इतरांसाठी संधी आणि नोकऱ्या निर्माण करणारे उद्योग आणि संस्था स्थापन कराव्यात - राज्यपाल जिष्णु देव वर्मा

## राज्यपाल यांची सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभाला उपस्थिती

दैनिक आपला विदर्भ

**पुणे । प्रतिनिधी** : सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाची भारताच्या आर्थिक वाढीत आणि राष्ट्रीय विकासात अर्थपूर्ण योगदान देतील अशा तंत्र उद्योजकांच्या आणि नवोन्मेषकांच्या नवीन पिढीसाठी दिशा देणारी संस्था बनण्याची क्षमता आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे राज्यपाल आणि विद्यापीठांचे कुलपती जिष्णु देव वर्मा यांनी केले. अभियंत्यांनी केवळ रोजगार शोधण्यापेक्षा इतरांसाठी संधी आणि नोकऱ्या निर्माण करतील अशी तंत्रज्ञान निर्मिती, उद्योग आणि संस्था स्थापन कराव्यात, असे आवाहनही त्यांनी केले. सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाच्या दीक्षान्त समारंभात ते बोलत होते. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, विद्यापीठाचे नियामक मंडळाचे अध्यक्ष विनायक पै, कुलगुरू प्रा. सुनील भिरुड,




राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. दयाराम सोनवणे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालक डॉ. यशोधरा हरिभक्त आदी उपस्थित होते.

सीओईपी ही संस्था जवळपास दोन शतकांपासून भारताचे भविष्य घडवत आहे, असे सांगून राज्यपाल पुढे म्हणाले, संस्थेचा वारसा केवळ शैक्षणिक उत्कृष्टतेवरच नाही, तर तिने घडवलेले अभियंते, उद्योजक, तंत्रज्ञ आणि राष्ट्रनिर्माते यांच्यावर उभा आहे. सीओईपीने केवळ तंत्रज्ञान संस्था न राहता तांत्रिक विचार, नवोपक्रम आणि समस्या सोडवण्याचे जागतिक केंद्र बनण्याची आकांक्षा बाळगली पाहिजे. स्वच्छ ऊर्जा, प्रदूषण, जल सुरक्षा, शाश्वत गतिशीलता, प्रगत उत्पादन, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), सेमीकंडक्टर्स आणि हवामान बदल अशा विविध क्षेत्रांतील आव्हानांकडे केवळ आव्हाने म्हणून नव्हे, तर नवोपक्रम, संशोधन आणि परिवर्तनात्मक उपायांच्या संधी म्हणून पाहिले पाहिजे.

सीओईपीचे माजी विद्यार्थी ही तिची सर्वात मोठी ताकद आहे. ते देशभरात आणि जगभरात विद्यापीठाचे दूत आहेत. ते संस्थेचा सन्मान वाढविण्यासह विद्यार्थ्यांच्या भावी पिढ्यांना प्रेरित करतात. माजी विद्यार्थ्यांचे बौद्धिक भांडवल विद्यापीठाच्या प्रयोगशाळा, विद्यार्थी आणि स्टार्टअप परिसंस्थेशी जोडले गेल्यास सीओईपी मार्गदर्शन आणि नवोपक्रमाचे एक शक्तिशाली चक्र तयार होऊ शकते. यामुळे मोठी गुंतवणूक, नवीन उद्योग आणि शाश्वत प्रभाव निर्माण होऊ शकतो, असे राज्यपाल जिष्णु देव वर्मा म्हणाले.

भविष्यातील विद्यापीठे एकाकीपणे काम करू शकत नाही; शिक्षण क्षेत्र, उद्योग, सरकार आणि समाज एकत्र येऊन समस्या सोडवतील, असे खुले व्यासपीठ विद्यापीठांना बनावे लागेल. सीओईपीने उद्योग, आघाडीची जागतिक विद्यापीठे, संशोधन संस्था आणि स्टार्टअप्स यांच्याशी भागीदारीच्या संधी शोधल्या पाहिजेत. विद्यापीठाने केवळ क्रमवारीतच नव्हे, तर संशोधन, नवोपक्रम, पेटंट्स, तंत्रज्ञान हस्तांतरण, स्टार्टअप्स आणि जागतिक शैक्षणिक सहकार्यामध्ये भारतातील सर्वोच्च संस्थांपैकी एक बनण्याची महत्त्वाकांक्षा बाळगावी, असे आवाहनही राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

## महत्त्वाचे...

### बंगाल विधानसभेचे माजी उपसभापती आशिष बॅनर्जी यांनी संपवलं जीवन; पत्रात म्हटलं, 'माझ्या मृत्यूला...'

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी** : माजी मंत्री आणि तृणमूल काँग्रेसचे आमदार आशिष बॅनर्जी यांचं रहस्यमयरित्या निधन झालंय. रामपूरहाट इथल्या त्यांच्या घराजवळील पक्ष कार्यालयात त्यांनी गळफास लावला. आज सकाळी या घटनेमुळे पश्चिम बंगालमध्ये खळबळ माजली आहे. पोलिसांना माहिती मिळाल्यानंतर ते घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांचा मृतदेह आता शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे. त्यांच्या मृतदेहाजवळ एक सुसाईट नोटही पोलिसांना सापडली आहे.

आशिष बॅनर्जी हे रामपूरहाट विधानसभा मतदारसंघातून पाच वेळा आमदार राहिले आहेत. तर त्यांनी पश्चिम बंगाल सरकारमध्ये शालेय शिक्षण, कृषी आणि आयुष यांसारखी खाती सांभाळत आहेत. त्यांनी राज्याच्या विधानसभेचे उपसभापती म्हणूनही काम केलं आहे. त्यांनी २०२६ ची पश्चिम बंगाल विधानसभा निवडणूक रामपूरहाटमधून तृणमूल काँग्रेसच्या तिकिटावर लढवली. पण भाजपचे उमेदवार ध्रुबा साहा यांच्याकडून त्यांचा पराभव झाला.

सुसाईट नोटमध्ये काय लिहिलंय?

पोलिसांना मृतदेहाजवळ एक पानी आत्महत्या चिठ्ठी सापडली आहे. बॅनर्जी यांच्या आत्महत्येमुळे राज्यातील राजकीय वर्तुळात खळबळ माजली आहे. त्यांनी या पत्रात लिहिलंय की, माझ्या मृत्यूला कोणीही जबाबदार नाही. पण आज मला जाणीव झाली आहे की राजकारणात येणे ही माझ्या आयुष्यातील सर्वात मोठी चूक होती. त्यांनी या पत्रात आपल्या स्वच्छ कारकिर्दीचा उल्लेख करत लिहिलंय की, त्याने आयुष्यभर कधीही बेकायदेशीरपणे एक पैसाही घेतला नाही आणि नेहमी विद्यार्थ्यांना कोणतेही शुल्क न घेता शिकवलं आहे.

त्यांनी पत्रात तारापीठ रामपूरहाट विकास प्राधिकरणात (टीआरडीए) आपल्याला बाजूला सारल्याचा आणि आपली प्रतिमा मलीन करण्याच्या कटांचा उल्लेख केला आहे. त्यांनी लिहिलंय की, या आपण कधीही कोणत्याही भ्रष्टाचारात सामील नव्हतो, तरीही आपला अपमान करण्यात येत आहे. आपले दु:ख आणि निराशा व्यक्त करत त्यांनी आपल्या कुटुंबाच्या भावी पिढ्यांना राजकारणात कधीही न येण्याचा सल्लाही या पत्रातून दिला आहे.

### मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन लवकरच सुरु होणार




दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी** : मुंबई-अहमदाबाद हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर (बुलेट ट्रेन) प्रकल्पांतर्गत मुंबईतील वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स (बीकेसी) आणि सुरत स्थानकांवर बांधकाम वेगाने सुरू आहे. सुरत स्थानक जवळपास पूर्ण झाले असून ते शहरातील हिरे उद्योगाचे दर्शन घडवते. दरम्यान, मुंबईतही काम वेगाने सुरू असून हे स्थानक लवकरच पूर्ण होईल. मुंबईतील बीकेसी स्टेशन हे या ५०८ किलोमीटर लांबीच्या कॉरिडॉरचे प्रारंभ बिंदू असेल. हे स्टेशन जमिनीखाली सुमारे ३० मीटर खोल बांधले जात आहे. उत्खनन आणि पायाभरणीचे काम अंतिम टप्प्यात आहे. बांधकाम स्थळावर मोठ्या प्रमाणावर उत्खनन, यंत्रसामग्री आणि भूमिगत संरचना दिसून येत आहेत.

सुरत स्थानकावरील संरचनात्मक काम पूर्ण झाले आहे. आता अंतर्गत सजावटीचे काम सुरु आहे. स्थानकाची रचना सुरतच्या हिरे कापण्याच्या उद्योगापासून प्रेरित आहे. स्थानकामध्ये जिने, प्लॅटफॉर्म, छत आणि रुळ टाकण्याचे कामही सुरू आहे. सुरत स्थानकावर 'सुरत' नावाचा फलकही लावण्यात आला आहे. हा हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉर मुंबई ते अहमदाबादपर्यंत पसरलेला असून, गाड्या ताशी ३२० किलोमीटर वेगाने धावतील. दोन्ही स्थानकांवर सुरू असलेले काम प्रकल्पाची प्रगती स्पष्टपणे दर्शवते, ज्यामुळे महाराष्ट्र आणि गुजरातमधील लोकांना लवकरच बुलेट ट्रेनने प्रवास करण्याची संधी मिळेल अशी आशा निर्माण झाली आहे.

रेल्वे मंत्रालयाने जाहीर केले आहे की, सुरत आणि वापी दरम्यानच्या बुलेट ट्रेन प्रकल्पाचा पहिला टप्पा ऑगस्ट २०२७ मध्ये सुरू होईल. केंद्र सरकारने २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात सात नवीन हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉरची घोषणा केली. यामध्ये मुंबई-पुणे, पुणे-हैदराबाद, हैदराबाद-बंगळूर, हैदराबाद-चेन्नई, चेन्नई-बंगळूर, दिल्ली-वाराणसी आणि वाराणसी-सिलिगुडी कॉरिडॉरचा समावेश आहे. रेल्वे मंत्रालयाने एका संसदीय स्थायी समितीला माहिती दिली की, जपानमध्ये बनवलेल्या ई१० मालिकेच्या शिंकानसेन बुलेट ट्रेनच्या बांधकामाबाबत चौकशी केली असता सविस्तर माहिती नाही परंतु भारताने स्वत:ची स्वदेशी बुलेट ट्रेन विकसित करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. बी२८ नावाने ओळखल्या जाणाऱ्या या भारतीय बनावटीच्या गाड्यांचा वेग ताशी २८० किलोमीटर इतका असेल.

### हिंदुस्थानाचा राष्ट्रध्वज भगवाच पाहिजे, म्हणत सांगलीत काढली पदयात्रा; संभाजी भिडे पुन्हा एकदा वादात

**सांगली । प्रतिनिधी** : शिवप्रतिष्ठाण हिंदुस्थानचे संस्थापक संभाजी भिडे उर्फ भिडे गुरुजी हे नेहमी त्यांच्या वादग्रस्त वक्तव्यांमुळं चर्चेत असतात. मात्र आता ते चर्चेत आले आहेत ते एका सोशल मीडियावरील पोस्टमुळं. या पोस्टरवर स्वातंर्त्य प्राप्तीनंतर अखंड हिन्दुस्थानचे स्वप्न उराशी बाळगून 'अखंड हिन्दुस्थानचा राष्ट्रध्वज म्हणून परम पवित्र भगवाच असला पाहिजे' असं म्हणण्यात आलं आहे. तसंच, सांगलीत संभाजी भिडे यांच्या नेतृत्वाखाली धारकऱ्यांनी हातात भगवे झेंडे घेऊन ही रॅली काढली. यावर काँग्रेस नेते सचिन सावंत यांनी संभाजी भिडे यांच्यावर जोरदार टीका केली आहे.

शिवप्रतिष्ठानकडुन सांगलीमध्ये हिंदवी स्वातंर्त्य दिन पदयात्रेचे आयोजन करण्यात आलं होतं. ज्यामध्ये संभाजी भिडे यांच्यासह शेकडो धारकरी सहभागी झाले होते. हातात भगवे ध्वज,भारत माता, छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज व बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमा घेऊन शहरातल्या प्रमुख मार्गावरून ही रॅली काढण्यात आली.

या पदयात्रेवरून काँग्रेस नेते सचिन सावंत यांनी संभाजी भिडे यांच्यावर टीका केली. स्वातंर्त्य दिनाच्या दिवशीच राष्ट्रध्वजाचा अवमान केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. वंदे मातरमच्या कथित अवमानाबाबत कारवाईची भूमिका घेतली जाते, तर राष्ट्रध्वजाच्या कथित अवमानाबाबत वेगळी भूमिका का, असा सवाल सावंत यांनी उपस्थित केला. आपल्या अधिकृत एक्स अकाऊंटवरून पोस्ट करत सचिन सावंत म्हणाले, ''स्वातंर्त्यादिनाच्या दिवशी मनोहर भिडे राष्ट्रध्वजाचा खुलेआम अपमान करतो. वंदेमातरमचा अपमान झाला तर शिक्षा आहे मग राष्ट्रध्वजाचा अवमान कसा खपवून घेतला जाऊ शकतो? ५२ वर्षे आपल्या कार्यालयावर तिरंगा न फडकावणाऱ्यांना आता तिरंगा यात्रा काढावीशी वाटली. पण भिडेवर गुन्हा दाखल करणार का? हा आमचा मुख्यमंर्त्यांना प्रश्न आहे. तशी आमची मागणी ही आहे,'असे ते म्हणाले.

### पिकअप चालकाने बड्या कंपनीच्या अधिकाऱ्याला केली मारहाण

**मुंबई । प्रतिनिधी** : सकाळी घाटकोपर पूर्व येथे ईस्टर्न एक्सप्रेस वे वर ओव्हरटेक करण्यावरून वाद झाला. एका पिकअप वाहनाच्या चालकाने हातात लाकडी काठी घेतली आणि ५० वर्षांच्या व्यक्तीच्या डोक्यात जोरात मारली. या घटनेत ५० वर्षीय व्यक्तीच्या डोक्याला जखम झाली. जखमी व्यक्ती रेमंड लिमिटेडमध्ये व्यवस्थापक अर्थात मॅनेजर या पदावर कार्यरत असल्याचे समजते.

ईस्टर्न एक्सप्रेस वे वर झालेल्या मारहाणीच्या प्रकरणात एफआयआर नोंदवून पोलिसांनी तपास सुरू केला आहे. मारहाणीत जखमी झालेल्या सचिन धुमाळ या अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीवरून पोलिसांनी एफआयआरची नोंद केली आहे. तक्रारदाराने दिलेल्या माहितीनुसार, ते प्रभादेवीतील आगर बाजार भागातून वोक्सवॅगन टायगुनमधून ठाण्यात कामावर जात होते. त्यांची कार रमाबाई आंबेडकर नगर येथील पुलाजवळून जात होती. धुमाळ कारमध्ये होते. त्याचवेळी ३५ वर्षीय पिकअप चालक राकेशकुमार श्रीवास्तव मागून त्याचे वाहन घेऊन आला. तो सतत हॉर्व वाजवत होता. वाहतूक कोंडीमुळे धुमाळ हळू गाडी चालवत होते आणि त्यांना रस्ता देणे शक्य झाले नाही. हायवे फॅसिलिटेशन सेंटरजवळ स्वत:ची कार थोडी बाजूला घेताच मागून येत असलेल्या पिकअपच्या वाहनाने वेगाने ओव्हरटेक केले. पण ओव्हरटेक करताना या वाहनाने तक्रारदाराच्या कारला धडक दिली आणि पिकअप गाडी पुढे आणून थांबवली.

पिकअपने दिलेल्या धडकेनंतर धुमाळ यांच्या गाडीच्या डाव्या बाजूचा आरसा खराब झाला. यावरून तक्रारदार आणि राकेशकुमार श्रीवास्तव यांच्यात वाद झाला. वाद वाढला आणि श्रीनिवासने लाकडी काठी घेऊन धुमाळ यांना डोक्यात जोराने मारली. काठीचा मार जोरात लागल्यामुळे धुमाळ लगेच रस्त्यावर कोसळले. पण धुमाळ यांनी स्वत:ला सावरत पोलीस नियंत्रण कक्षाला फोन केला. पंतनगर पोलीस घटनास्थळी पोहोचले. त्यांनी पिकअप चालक राकेशकुमार श्रीवास्तव याला ताब्यात घेतले. जखमी धुमाळ यांना राजावाडी रुग्णालयात वैद्यकीय उपचारांसाठी नेण्यात आले.

# ती झाडं आता कुठेयत? सयाजी शिंदेंनी खासदार ओमराजे निंबाळकरांना भरमंचावर विचारलं अन्.; धाराशिवच्या कार्यक्रमात नेमकं काय घडलं?

दैनिक आपला विदर्भ

**धाराशिव । प्रतिनिधी** : हिंदी, मराठी आणि दाक्षणात्य चित्रपटांमध्ये आपल्या अभिनयाने घराघरात पोहोचलेले अभिनेते सयाजी शिंदे गेल्या अनेक वर्षांपासून वृक्षारोपणाची जबाबदारी पेलताना दिसतात. अनेकदा त्यांच्या सोशल मीडियावरून ते वृक्षारोपण करण्याचा आवाहनही करत असतात. प्रसंगी जाब विचारायला आणि सरकारला खडसवायलाही ते मागे पुढे पाहत नाहीत. धाराशिवमध्ये वृक्ष लागवडीच्या एका कार्यक्रमात त्यांनी भर कार्यक्रमात खासदार ओमराजे निंबाळकर यांना 'जेवढी मतं मिळाली तेवढी झाडं लावणार' या त्यांच्या जुन्या आश्वासनाची आठवण करून देत 'कुठे आहेत ही झाडं? असा सवाल केला. वृक्ष लागवडीच्या विश्वविक्रमावरून आणि गिनीज रेकॉर्ड बनवून प्रश्न उपस्थित करत वनमोहिमेसारख्या विषयावरून अभिनेते सयाजी शिंदे यांनी जोरदार टोलेबाजी केली. वृक्ष लागवडीचा कार्यक्रम सयाजी शिंदे यांच्या टोलेबाजी आणि नेत्यांचे उत्तरांमुळे चांगलाच रंगला होता.

नेमकं घडलं काय?

धाराशिवमध्ये हरित धाराशिव मोहीम अंतर्गत १२ तासात १० लाखांहून अधिक देशी वृक्ष लागवडीचा गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड करण्यात आला. सलग दुसऱ्या



वर्षी वृक्ष लागवड करत या विश्वविक्रम रचल्यानिमित एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला अभिनेते सयाजी शिंदे उपस्थित होते. या कार्यक्रमात गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड वरून अनेक प्रश्न उपस्थित करत वनमोहिमसारख्या विषयावरून अभिनेते सयाजी शिंदे यांनी जोरदार टोलेबाजी केली.

'खासदार ओमराजे निंबाळकर यापूर्वी एकदा म्हणाले होते की जेवढ्या मतांनी निवडून आलो, तेवढी पाच लाख झाड लावणार. त्यांची बातमी पेपर मध्ये वाचून मी त्यांना भेटायला आलो होतो. हे झाड लावलीत असं ते म्हणतात. तेही एकदा चेक करायला हवं. असंच कोणावर विश्वास नाही ठेवायला पाहिजे. कुठे लावलीत? का गेली कुठेतरी लावून.. हे एकदा जर चेक करायला मिळाली तर आपण म्हणू शकतो की सगळेच आमदार खासदार खोटे बोलत नाहीत, खरं पण बोलणारे आहेत.लावले असतील तर खरंच चांगलंय, नाहीतर बोलणं फार सोपं असतं. फॉरेस्ट डिपार्टमेंट, कलेक्टर हे सगळे पगार घेऊन काम करतात. पण आम्ही ४० देवराया सुरू केल्या आहेत. ना कोणी सीएसआर दिलाय.५० लाखांचा वर टर्नओव्हर नाही. आणि ४० देवराया लागल्या आहेत. इथं तुमच्या दोन एकराला अडीच- तीन कोटी असतात. ५० लाखांच्या वर गेलो नाहीत तर एवढ्या देवराया कशा लागल्या? कारण आमची डोक्यातून पॉवर येते. हृदयातून पॉवर येते.'

पुढे गिनीज बुकवरून बोलताना ते म्हणाले ' इथं गिनीज बुकवाले कोण आहेत? तुम्ही गिनीज बुकवाले आम्हाला कायम भारावून टाकता. भीती पण दाखवता. तुम्ही खूप ग्रेट आहात का? आपल्याला सारखं वाटत असतं की हे गिनीज बुक रेकॉर्ड म्हणजे फार ग्रेट आहे. पण यामध्ये असं आहे का - १० लाख झाड लागली, मग पुढची १० वर्ष ती जगली असा रेकॉर्ड पाहिजे ना! ' बीडच्या प्रोजेक्टचं काय झालं? अजितदादा मला बोलत होते- मी म्हटलं असे लागत नसतात झाडं. १५ लाख झाड लावले. गिनीज बुकमध्ये नोंद केली. नंतर मला त्या प्रोजेक्टचे फोटो आले. मग पहिल्या वर्षी गिनीज बुकमध्ये गेलेला प्रोजेक्ट दुसऱ्या वर्षी ढासळला याची पण नोंद करा.. असं करता येईल का तुमच्या गिनीज बुकमध्ये? झाडे लावण्यासाठी हे नाटक कशाला पाहिजे? कारण माझं असं म्हणणं आहे- आईने जन्म दिल्यानंतर आपण पहिल्यांदा ऑक्सीजन घेतो.आणि हे ऑक्सिजन झाड देतं.त्यामुळे जगात आईनंतर मोठं कोण असेल तर ते झाड आहे,दुसरं कोणी नाही. श्वास ही झाडापासून अन्नही झाडापासून, बाकी तुम्ही काहीही करा. तुम्ही कितीही लहान असा मोठे असा..जगायला लायक असाल तर तुमच्या वय एवढे झाड तुम्ही लावायला हवेत.तरच तुम्ही जगायला लायक आहात.' असंही सयाजी शिंदे म्हणाले.

सयाजी शिंदेंच्या टोलेबाजीनंतर पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी गिनीज बुक ऑफ रेकॉर्डवरील वक्तव्यावर दिलखुलास भाष्य केलं. आम्ही राजकारणी आहोत, आम्हाला मागे- पुढे खाली -वर सगळीकडे बघावं लागतं. सयाजी शिंदेंना त्याचं काहीही देणंघेणं नाही. असं सांगत आपल्याही नावावर एक गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड असल्याचा सांगितलं. नंतर खासदार ओमराजे निंबाळकर यांनी सयाजी शिंदे यांच्या वक्तव्यानंतर वृक्ष लागवडीचा पुरावा दाखवला. वृक्ष लागवडीचा कार्यक्रम सयाजी शिंदे यांची टोलेबाजी आणि नेत्यांचे उत्तरामुळे हा कार्यक्रम चांगलाच रंगला होता.

# अभिनेत्री अनन्या राज यांचे ३५ व्या वर्षी निधन: मानसिक आणि शारीरिक आजारांशी झुंजत होती; कुटुंबीय म्हणाले- झोपेतच थांबला श्वास

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी** : चित्रपट ७ आवर्स टू गो आणि घोस्ट फेम अभिनेत्री अनन्या राज यांचे वयाच्या ३५ व्या वर्षी निधन झाले आहे. त्यांच्या कुटुंबीयांनी सोशल मीडियावर या बातमीची पुष्टी केली आहे.

कुटुंबीयांच्या माहितीनुसार, अनन्या यांचे निधन १५ जुलैच्या सकाळी झोपेतच झाले. त्या गेल्या एका वर्षापेक्षा जास्त काळापासून शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्या समस्यांशी झुंज देत होत्या.

कुटुंबीयांनी इंस्टाग्रामवर एक पोस्ट शेअर करून त्यांच्या आत्म्याच्या शांतीसाठी प्रार्थना करण्याचे आवाहन केले आहे.

अनन्या राजच्या कुटुंबीयांनी तिच्या अधिकृत इंस्टाग्राम अकाउंटवर एक भावुक निवेदन जारी करून तिच्या निधनाची माहिती दिली. कुटुंबीयांनी लिहिले की, ते अत्यंत जड अंतःकरणाने हे सांगत आहेत की, १५ जुलै रोजी पहाटे अनन्याचे निधन झाले. ती झोपेतच शांतपणे या जगाचा निरोप घेऊन गेली.

पोस्टमध्ये लिहिले होते की, गेल्या एका वर्षापेक्षा जास्त काळापासून ती शारीरिक आणि मानसिक त्रासातून जात होती आणि तिने एका योद्ध्याप्रमाणे त्याचा सामना केला.

२०१६ मध्ये बॉलिवूडमध्ये पदार्पण केले होते

मुंबईत वाढलेल्या अनन्या राजने हिंदी आणि प्रादेशिक सिनेमात आपली ओळख निर्माण केली होती. तिने २०१६ मध्ये ७ आवर्स टू गो या थ्रिलर चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले होते.

त्यानंतर ती २०१७ मध्ये आलेल्या द फायनल एक्झिट आणि २०१९ मध्ये विक्रम भट्ट दिग्दर्शित हॉरर चित्रपट घोस्ट मध्ये दिसली. चित्रपटांव्यतिरिक्त, ती अनेक प्रसिद्ध म्युझिक व्हिडिओंमध्येही दिसली, ज्यामुळे तिला प्रेक्षकांमध्ये ओळख मिळाली.

तेलुगु आणि इतर प्रादेशिक चित्रपटांमध्येही काम केले

हिंदी चित्रपटांव्यतिरिक्त अनन्याने प्रादेशिक सिनेमातही आपले नशीब आजमावले होते. तिने २०२२ मध्ये प्रदर्शित झालेल्या थगडे ले या तेलुगु सस्पेन्स थ्रिलर चित्रपटात काम केले होते.



श्रीनिवास राजू दिग्दर्शित या चित्रपटात ती नवीन चंद्रा, दिव्या पिल्लई आणि पी. रविशंकर यांच्यासोबत दिसली होती. याव्यतिरिक्त, तिने मद्रासी गँग या त्रिभाषी चित्रपटातही मुख्य भूमिका साकारली होती.

कुटुंबाने गोपनीयता राखण्याची विनंती केली

कुटुंबाने जारी केलेल्या निवेदनात पुढे म्हटले आहे की, अनन्या एक कणखर मनाची मुलगी होती आणि राणीसारखी जगली. कुटुंबीयांनी लिहिले की, तिच्या जाण्याने जी पोकळी निर्माण झाली आहे, ती नेहमीच जाणवेल.

या कठीण प्रसंगी, कुटुंबीयांनी चाहते आणि माध्यमांना त्यांच्या गोपनीयतेचा (प्रायव्हसीचा) आदर करण्याची आणि अभिनेत्रीच्या आत्म्याच्या शांतीसाठी प्रार्थना करण्याची विनंती केली आहे.

# आमदार सिद्धार्थ खरात यांच्या वाढदिवसानिमित्त इंदुरीकर महाराजांचा कीर्तन सोहळा उत्साहात

## इंदुरीकर महाराजांच्या ओघवत्या प्रबोधनाने डोणगावकर मंत्रमुग्ध; हजारो नागरिकांची उपस्थिती







दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव :** मेहकर-लोणार विधानसभा मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांच्या वाढदिवसानिमित्त १५ ऑगस्ट रोजी डोणगाव येथे महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकार ह. भ. प. निवृत्ती महाराज इंदुरीकर यांच्या भव्य कीर्तन व प्रबोधन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. निंबाजी पांडव, तालुकाप्रमुख यांच्या पुढाकाराने आयोजित या कार्यक्रमाला डोणगावसह परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

यावेळी आमदार सिद्धार्थ खरात, नगराध्यक्ष किशोर गारोळे, प्रा. आशिष राहाटे, उपजिल्हाप्रमुख निंबाजी पांडव, तालुकाप्रमुख, अँड ,आकाश घोडे, युवा सेनाप्रमुख, अर्जुनराव बाजड, दीपक गायकवाड, पवन टाले, संतोष मेटांगळे, प्रकाश मानवतकर, सुरज बाजड, मदन बाजड, राजू दांदडे, विनायक टाले, प्रदीप बापू देशमुख यांच्यासह विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांची मोठी उपस्थिती होती.

इंदुरीकर महाराजांनी आपल्या खास ओघवत्या शैलीतून विविध सामाजिक विषयांवर प्रभावी प्रबोधन केले. जिल्हा परिषदेच्या शाळा वाचल्या पाहिजेत, जिल्हा परिषद शाळांना प्राधान्य दिले पाहिजे, तसेच शिक्षणाच्या माध्यमातून समाजाची पुढील पिढी घडविण्यासाठी प्रत्येकाने योगदान दिले पाहिजे, असा संदेश त्यांनी दिला.

याशिवाय कुटुंबव्यवस्था, शिक्षण, संस्कार, सामाजिक जबाबदारी, तरुणांची भूमिका आणि समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी आवश्यक असलेल्या विविध सामाजिक विषयांवर त्यांनी आपल्या खास शैलीतून भाष्य केले. त्यांच्या प्रभावी प्रबोधनाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.

कीर्तन सोहळ्यादरम्यान इंदुरीकर महाराजांनी आमदार सिद्धार्थ खरात यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत त्यांच्या सामाजिक व लोकसेवेच्या कार्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. महिला भगिनींसह डोणगाव व परिसरातील नागरिकांचीही कार्यक्रमाला लक्षणीय उपस्थिती होती.

भक्ती, प्रबोधन आणि सामाजिक संदेशाने भारलेल्या या सोहळ्यामुळे डोणगाव परिसरात नवचैतन्याचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी डोणगाव व परिसरातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ पत्रकार सिद्धेश्वर पवार यांनी केले.

आमदार सिद्धार्थ खरात म्हणाले...

डोणगावच्या भूमीत इंदुरीकर महाराजांचे कीर्तन आणि प्रबोधनाचा कार्यक्रम आयोजित करता आला, ही माझ्यासाठी आनंदाची बाब आहे. महाराजांच्या विचारातून समाजाला दिशा देणारे संदेश मिळतात. शिक्षण, संस्कार आणि सामाजिक एकोपा यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे काम केले पाहिजे. वाढदिवसानिमित्त मिळालेल्या प्रेमापेक्षा समाजासाठी काहीतरी चांगले करण्याची प्रेरणा माझ्यासाठी अधिक महत्त्वाची आहे. जनतेचा विश्वास आणि आशीर्वाद हीच माझी खरी ऊर्जा आहे.''

## वृत्तविशेष...

### गाडीला जॅमर लावलं, चालक संतापला; भररस्त्यात चक्क स्वत:चीच कार पेटवली, छत्रपती संभाजीनगरमध्ये खळबळजनक घटना

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगर शहरातून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. रस्त्यावर पार्क केलेल्या चारचाकीला पोलिसांनी जॅमर लावल्याच्या रागातून संतप्त झालेल्या चालकाने चक्क स्वत:चीच कार पेटवून दिल्याची घटना घडली आहे. जॅमर काढण्यासाठी वारंवार विनंती करूनही प्रशासनाकडून दुर्लक्ष झाल्याचा आरोप चालकाकडून करण्यात येत आहे. या घटनेमुळे शहरात मोठी खळबळ उडाली असून, पोलीस आणि महापालिका प्रशासनाच्या कारभारावरही प्रश्न उपस्थित झाले आहेत.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित चालकाने आपली चारचाकी रस्त्यावर पार्क केली होती. त्यानंतर पोलिसांनी या वाहनाला जॅमर लावला. वाहनाला जॅमर लावल्यानंतर चालकाने तो काढण्यासाठी पोलीस तसेच महानगरपालिका प्रशासनाकडे विनंती केल्याची माहिती आहे. मात्र, वारंवार विनंती करूनही जामर काढण्यात आला नाही, असा चालकाचा आरोप आहे.

जॅमर काढण्यासाठी प्रशासनाकडून सहकार्य मिळत नसल्याने चालक संतप्त झाला. त्यानंतर त्याने टोकाचे पाऊल उचलत स्वत:च्या कारलाच आग लावल्याचे समोर आले आहे. भररस्त्यात कार पेटवल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. काही वेळातच वाहनातून मोठ्या प्रमाणात धूर आणि आगीच्या ज्वाळा बाहेर पडताना दिसत होत्या. या घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. भररस्त्यात वाहन पेटवल्याने काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले.

दरम्यान, चालकाने जॅमर काढण्यासाठी प्रशासनाकडे वारंवार विनंती केल्याचा दावा केला आहे. मात्र, त्याच्या मागणीकडे दुर्लक्ष करण्यात आल्याने त्याने संतापाच्या भरात स्वत:चीच कार पेटवली, असा आरोप करण्यात येत आहे. या घटनेमुळे आता स्थानिक पोलीस आणि म हापालिकेच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, संबंधित जबाबदार कर्मचाऱ्यांवर काय कारवाई होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### नेव्ही नगरमध्ये नौदल कर्मचाऱ्याची कुटुंबासह राहत्या घरात आत्महत्या; पोलिसांकडून तपास सुरू

**मुंबई । प्रतिनिधी :** कुलाबा येथील नेव्ही नगर परिसरात नौदल कर्मचाऱ्यासह त्याची पत्नी आणि दोन मुलांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना शनिवारी रात्री समोर आली. मृतांमध्ये दोन म हिन्यांचे चिमुकले बाळ आणि तीन वर्षांच्या म ुलाचा समावेश असल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, शनिवारी रात्री साडेअकराच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. नौदल कर्मचाऱ्याच्या घरातून कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याने संशय निर्माण झाला. त्यानंतर घरात पाहणी केली असता चौघेही मृतावस्थेत आढळून आले.

प्राथमिक माहितीनुसार, नौदल कर्मचाऱ्याने गळफास घेतल्याचा संशय आहे. तर त्याची पत्नी आणि दोन्ही मुलांचा मृत्यू विषप्राशनामुळे झाला असावा, असा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. मात्र, मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

घटनेची माहिती मिळताच पोलीस तसचे नौदलाचे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. चौघांचे मृतदेह ताब्यात घेऊन उत्तरीय तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत.

### फिफा विश्वचषक विजेत्या स्पेनचा क्रिकेटमध्ये जबरदस्त कारनामा

**मुंबई । प्रतिनिधी :** आयसीसीचा सहयोगी देश असलेल्या स्पॅनिश क्रिकेट संघानं गेल्या काही वर्षात मैदानावर प्रभावी कामगिरी दाखवत ऑस्ट्रेलियन क्रिकेट संघाचा २३ वर्षांचा जुना विक्रम मोडत काढला आहे. स्पेनमध्ये फुटबॉल हा एक लोकप्रिय खेळ असला तरी, तिथं आता क्रिकेटलाही लोकप्रियता मिळत आहे. २०२६ चं फिफा विश्वचषक जिंकलेल्या स्पेननं आता आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक सलग विजय मिळवणारा संघ बनण्याचा मान मिळवला आहे आणि ऑस्ट्रेलियाचा २१ सलग विजयांचा २३ वर्षांचा जुना विक्रम मोडला आहे. स्पॅनिश संघाला २०१९ मध्ये टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळण्यासाठी आयसीसीची मान्यता मिळाली. तेव्हापासून, त्यांनी खेळलेल्या ५१ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांपैकी ४२ सामने जिंकले आहेत, केवळ आठ सामन्यांमध्ये त्यांना पराभव पत्करावा लागला आहे आणि एक सामना रद्द झाला आहे.

## सोनिया गांधींची परवानगी असताना मनमोहन सिंग यांच्यात नाही म्हणण्याची क्षमता होती का?; प्रकाश महाजनांचा पृथ्वीराज चव्हाणांना थेट सवाल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** भाजपाचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे हे काँग्रेसमध्ये प्रवेश करणार होते, असा खळबळजनक गौप्यस्फोट राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केला होता. पृथ्वीराज चव्हाण यांच्या या दाव्यानंतर राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून आता यावर प्रकाश महाजन यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

पृथ्वीराज चव्हाणांच्या वक्तव्याचा समाचार घेताना प्रकाश महाजन म्हणाले की, सोनिया गांधी यांची परवानगी असताना मनमोहन सिंग यांच्यात नाही म्हणण्याची क्षमता होती का? पंतप्रधान कार्यालय सांभाळणाऱ्या पृथ्वीराज चव्हाण यांना हे माहीत नसावे. गोपीनाथ मुंडेंची पक्षातील नाराजी लपून नव्हती आणि ते काँग्रेसमध्ये प्रवेश करणार होते, तसेच भाजपमधील काही लोकांना ते काँग्रेसमध्ये जावेसे वाटत होते. मात्र, काँग्रेसमधील काही लोकांना म्हणजे




विलासराव देशमुख यांना गोपीनाथराव काँग्रेसमध्ये नको होते. दुसरीकडे, शरद पवार यांना वंजारी समाज मुंडेंसोबत राहील असे वाटल्याने त्यांनी प्रयत्न करून हा प्रवेश हाणून पाडला, असा दावा त्यांनी केलाय.

प्रकाश महाजन पुढे म्हणाले की, नागपूरचे दोन लोक यावर आक्षेप. गडकरी ठीक पण देवेंद्र फडणवीस हे गोपीनाथराव यांच्या विरोधात जाणे शक्य नाही. गोपीनाथराव कधीही निवडणुकीला घाबरत नव्हते. गोपीनाथरावांच्या राजकीय खुनाचे डाग पृथ्वीराज चव्हाण यांच्या कपड्यावर आहेत. भाजप पक्षाने मुंडेंचा न्याय गडकरींना लावला नाही, पक्षाने गडकरींना मोठे स्थान दिले पण मुंडेंचा एक काळ अपमान केला. मुंडेवर अन्याय म्हणून फुंडकर यांना विरोधी पक्षनेतेपदावरून काढणारे गडकरीच होते, असा आरोप देखील त्यांनी यावेळी केला. बहीण-भावात जमत नसेल पण देवेंद्र फडणवीस यांचे प्रेम गोपीनाथराव यांच्यावर होतेच, असे देखील प्रकाश महाजन म्हणाले.

पृथ्वीराज चव्हाण म्हणाले होते की, मी मुख्यमंत्री असताना गोपीनाथ मुंडे आणि काँग्रेसचे वरिष्ठ नेते अहमद पटेल यांच्यात गुप्त बैठका झाल्या होत्या. गोपीनाथ मुंडे यांनी मंत्री करण्याची अट घातली होती, मंत्रीपद द्या अन्यथा नागपूरचे दोघे म ला निवडून येऊ देणार नाहीत, असेही गोपीनाथ मुंडेंनी त्यावेळी म्हटले होते. सोनिया गांधी यांनी गोपीनाथ मुंडेंच्या पक्षप्रवेशाला परवानगी दिली, मात्र तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी विरोधी पक्षातला खासदार आपल्याकडे घेऊन मंत्री करणार नाही, अशी भूमिका घेतल्यानं त्यांचा प्रवेश झाला नाही, असा गौप्यस्फोट त्यांनी केला होता.

## धक्कादायक! वाढदिवसाच्या केकमध्ये आढळली पाल, ११ जणांना विषबाधा; ४ जण आयसीयुमध्ये

दैनिक आपला विदर्भ

**नालासोपारा । प्रतिनिधी :** नालासोपारा पूर्वेकडील लक्ष्मी नगर परिसरातील निळकंठ अपार्टमेंटमध्ये वाढदिवसाच्या पार्टीदरम्यान अन्नातून विषबाधा झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेत तब्बल ११ जणांना त्रास झाल्याने त्यांना तातडीने स्थानिक विजय लक्ष्मी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यापैकी ४ जणांची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. उर्वरित ७ जणांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी निळकंठ अपार्टमेंटमध्ये एका मुलीच्या वाढदिवसानिमित्त पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला इमारतीतील तसेच परिसरातील काही जण उपस्थित होते. वाढदिवसाचा केक कापल्यानंतर उपस्थितांनी तो खाल्ला. मात्र, काही वेळातच काही जणांना मळमळ, उलट्या आणि चक्कर येण्यास सुरुवात झाली. एकाच वेळी अनेकांची प्रकृती बिघडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.

केकमध्ये आढळली पाल

दरम्यान, कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या काही मुलांनी केकमध्ये पाल पडल्याचा आरोप केला आहे. केक खाल्ल्यानंतरच सर्वांना त्रास सुरू झाल्याने दूषित केकमुळे विषबाधा झाल्याचा दावा करण्यात येत आहे. मात्र, केकमध्ये नेमके काय आढळले आणि विषबाधेचे कारण काय आहे, हे अद्याप अधिकृतपणे स्पष्ट झालेले नाही. घटनेची माहिती मिळताच सर्व बाधितांना तातडीने विजय लक्ष्मी रुग्णालयात दाखल करण्यात आले. यातील ४ जणांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांच्यावर घ्ण्ळमध्ये उपचार सुरू आहेत, तर ७ जणांवर जनरल वॉर्डमध्ये उपचार सुरू आहेत.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी रुग्णालयात धाव घेतली. केकमुळेच विषबाधा झाली का, केकमध्ये पाल असल्याचा दावा खरा आहे का, तसेच अन्नाचे नमुने तपासल्यानंतर नेमके कारण काय समोर येते, याचा तपास सुरू आहे. त्यामुळे या प्रकरणातील अधिकृत माहिती तपासानंतरच स्पष्ट होणार आहे.

### इंडोनेशियात भूकंपाचा हाहाकार

जकार्ता : इंडोनेशियातील फ्लोरेस बेटांच्या किनारपट्टीजवळ आज शनिवारी (१५ ऑगस्ट) सकाळी ७.७ तीव्रतेचा भूकंप झाला. देशाच्या हवामानशास्त्र, हवामान आणि भूभौतिकी संस्थेने या घटनेची माहिती दिली. या भूकंपाच्या धक्क्यांमुळे घबराट पसरली. आतापर्यंत २० जणांचा मृत्यू झाल्याची माहिती असून, बचाव पथकं ढिगाऱ्याखाली अडकलेल्या नागरिकांचा शोध घेत आहेत. एनसीएस नुसार, हा भूकंप भारतीय प्रमाणवेळेनुसार पहाटे ३:४३ वाजता झाला.

## आमदार मॅरेथॉनला अभूतपूर्व प्रतिसाद; सिद्धार्थ खरात यांच्या हस्ते रिबीन कापून उद्घाटन

### नागपूरच्या सोहम चौधरीसह शेगावच्या प्रणाली शेगोकारची बाजी

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर । प्रतिनिधी :** क्रीडा संस्कृतीला प्रोत्साहन देतानाच युवकांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने मेहकर-लोणार विधानसभा मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित आमदार मॅरेथॉन स्पर्धेला रविवारी अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. शिवसेना, युवासेना, महिला आघाडी तसेच सर्व अंगीकृत संघटनांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

मेहकर शहरातील जानेफळ चौक येथे आमदार सिद्धार्थ खरात यांच्या हस्ते रिबीन कापून मॅरेथॉन स्पर्धे चे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते, स्पर्धक आणि नागरिकांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत स्पर्धेला उत्साहात सुरुवात झाली.




सकाळी ६ वाजता १० किलोमीटर, तर ७ वाजता ५ किलोमीटर धावण्याच्या स्पर्धेला प्रारंभ झाला. स्पर्धेचा प्रारंभ आणि समारोप जानेफळ चौक येथेच झाला. विविध जिल्ह्यांतून आलेल्या स्पर्धकांसह स्थानिक नागरिकांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग घेतल्याने संपूर्ण परिसरात क्रीडामय वातावरण निर्माण झाले होते. आमदार सिद्धार्थ खरात हे सकाळपासूनच मॅरेथॉनच्या ठिकाणी उपस्थित राहून स्पर्धकांचा उत्साह वाढवत होते. त्यांच्या उपस्थितीमुळे स्पर्धक आणि कार्यकर्त्यांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला. नगराध्यक्ष किशोर गारोळे यांनीही सकाळपासून उपस्थित राहून स्पर्धकांना प्रोत्साहन दिले. आमदार मॅरेथॉनच्या १० किलोमीटर पुरुष गटात नागपूर येथील सोहम चौधरी याने प्रथम क्रमांक पटकावला. नाशिकच्या कार्तिक कुमारने द्वितीय, तर नागपूरच्या राहूर हरीणखेडेने तृतीय क्रमांक मिळविला. विजेत्यांना बक्षीस व मेडल देऊन गौरविण्यात आले. १० किलोमीटर मुलींच्या गटात नागपूरच्या अंजली मडावी हिने प्रथम क्रमांक पटकावला. अमरावतीच्या वैष्णवी वानखेडेने द्वितीय, तर टेंभुर्णीच्या भाग्यश्री तागवाले हिने तृतीय क्रमांक मिळविला. ५ किलोमीटर पुरुष गटात नागपूरच्या राजन यादवने प्रथम क्रमांक पटकावला. नाशिकच्या उजेर खानने द्वितीय, तर अकोल्याच्या आकाश ठाकरेने तृतीय क्रमांक मिळविला. ५ किलोमीटर मुलींच्या गटात शेगावच्या प्रणाली शेगोकार हिने प्रथम क्रमांक पटकावत बाजी मारली. जळगाव खान्देशच्या जानवी रोजोदे हिने द्वितीय, तर चिखलीच्या गौरी राठोड हिने तृतीय क्रमांक मिळविला.

स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना आमदार सिद्धार्थ खरात, नगराध्यक्ष किशोर गारोळे, डॉ. सार्थ खरात आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षीस व मेडल देऊन गौरविण्यात आले. तसेच स्पर्धेत सहभागी झालेल्या प्रत्येक स्पर्धकाला प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. आमदार सिद्धार्थ खरात यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या मॅरेथॉनच्या माध्यमातून क्रीडा संस्कृती, आरोग्य आणि युवकांना प्रोत्साहन देण्याचा संदेश देण्यात आला. विविध जिल्ह्यांतून आलेल्या धावपटूंनी सहभाग नोंदविल्याने मेहकरमध्ये या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी शिवसेना उबाठा गटाचे तालुकाप्रमुख निंबाजी पांडव, युवासेना तालुकाध्यक्ष अँड. आकाश घोडे, नगरसेवक अमरअँड संदीप गवई,झघोडे, संदीप गारोळे, दशरथ चनखोरे, विजय खरात, आर्यन निकम, सुमित घोडे, गोपाल गायकवाड, सुमित धोटे, इम्रान अन्सारी, विजय जयपुरे, शरद बुरकुल, प्रणित भिसे, अमोल मोरे, शुभम पानखेडे, महेश गायकवाड, गोविंद गायकवाड, सचिन राऊत, ज्ञानेश्वर उगलमुगल, आकाश जुनघरे, वाजीत अन्सारी, स्वप्नील राऊत, शुभम सपकाळ, भागवत परिस्कर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.